-: प्रकरण :- सहावे :-

3) इतर कार्य:-

मंत्रीपदाचा यशस्वी रित्या कारभार चालवित असताना बाळासाहेब देसाई यांचा इतर कार्याशी सुध्दा संबंध होता. नाटय चित्रपट, तमाषा, मल्लविद्या इत्यादीं क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य श्रेष्ठ दर्जाचे आहे.

बाळासाहेब देसाई यांनी महाराष्ट्राच्या वैभवात भर घालण्यासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. त्याचबरोबर विशेषत: कोल्हापूर व पाटण विभागाचा विकास करण्यासाठी त्यांनी केलेली कामगिरी मोलाची आहे. शेतकरी, कष्टकरी, ग्रामीण, गरीब व बहुजन समाज यांच्यासाठी त्यांनी केलेली कामगिरी असामान्य आहे. जीवनामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून त्यांनी प्रवास यात्रा केली. मराठयांच्या इतिहासाविषयी त्यांना अपरंपार प्रेम होते.[1]

बाळासाहेब देसाई यांनी अनेक क्षेत्रात कामगिरी केली आहे. त्यांनी केलेल्या कामगिरीचा ठळक रुपाने आढावा घेणे उचीत ठरेल.

बाळासाहेब व पाटण:-

पाटण ही बाळासाहेबांची जन्मभूमी होती. कोयना परिसराचा सर्वांगीण विकास करण्याचा ख-या अर्थाने जर कोणी प्रयत्न केला असेल तर तो म्हणजे " कोयनेचे सुपूत्र" बाळासाहेब देसाई हे होय.

बाळासाहेबांचे नेतृत्व पाटण तालुक्याला मिळण्यापूर्वी हा तालुका मागास म्हणून ओळखला जात होता. मानसीक, राजकीय, सामाजिक, आर्थीक , शैक्षणिक इत्यादीं दृष्टिकोनातून कोणत्याच प्रकारचा विकास झालेला नव्हता, या तालुक्याचा दोन तृतीयांश भाग डोंगर द-याखो-यामध्ये

बसलेला होता. सरकारी कार्यालये, मार्केटिंग कमिटया, सुपरबाझार कमिटया, व्यापारी कमिटया, व तालुका पातळीवरील सर्व संस्था, कराड या ठिकाणी होत्या. त्यामुळे लोकांना आपली कामे करुन घेण्यासाठी कराडला जावे लागे. या तालुक्यात कोणत्याच प्रकारची जागृती नसल्यामुळे, कोणत्या तरी पुढा-याच्या मागून जनता जात होती. ते पुढारी राजकीय स्वार्थासाठी पाटणच्या जनतेचा वापर करीत होते असा हा पाटणचा ओबडधोबड, अविकसीत व मागासलेला भाग होता.[२]

पाटणला राजकीय व सामाजिकदृष्टया जागे करण्याचे अत्यंत महत्वाचे काम केले. बाळासाहेबांनी पाटणच्या जनतेला संघटित केले, त्यांची मानसीक तयारी केली. व त्यांना पुढचं पाऊल टाकण्यास प्रवृत्त केले. सरकारी व इतर योजनांचे फायदे कशाप्रकारे करुन घेता येतील याचे मार्गदर्शन केले व ख-या अर्थाने जनजागृती घडवून आणली. १९४१ साली सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाल्यानंतर व विविध खात्याचा मंत्रीपदाचा कारभार सांभाळताना अनेक योजनांच्या माध्यमातून त्यांनी आपल्या जन्मभूमीचा कायापालट केला.

पाटण तालुक्याच्या डोंगराळ भागातून अनेक रस्त्याचे जाळे त्यांनी तयार केले तालुक्यात वाहतुकीची साधने उपलब्ध करुन तालुक्यात प्रथमत: एकात्मता निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. गावे-गांवाशी जोडली, माणसे-माणसांशी जोडली व त्यातूनच तालुक्याची जडणघडण केली.[3]

पाटण तालुक्याच्या परिसरामध्ये एक विकासाचे चित्र बाळासाहेब देसाई यांनी रेखाटले. कोयना परिसराचा शिस्तबध्द कायापालट केला. पाटण तालुक्याच्या वाटयाला आलेला ओबड धोबडपणा घालवून कोयना खो-यातील समाजाला जागे केले. यासाठी त्यांनी ४५ वर्षाहून अधिक काळ सेवा केली. भूकंपानंतर विस्कटलेली मने सावरली, त्यांना परिसरात राहून आपले भविष्य उज्वल करण्यासाठी शिस्तबध्द पुर्नवसन त्यांनी केले. पुर्नवसन करताना कोयना परिसराची चेहरेपटटी बदलण्यासाठी त्यांनी आपले कर्तृत्व व सत्ता पणाला लावली. विकासाच्या कामाला वेग यावा आणि

शेतक-याचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी ज्या कोयनेच्या परिसरामध्ये साखर निर्मीती होण्याची सुतराम शक्यता नव्हती त्याठिकाणी मरळीच्या माळावर त्यांनी साखर कारखाना उभा केला, मरळीच्या माळावर निनाईदेवीला गोड नैवेद्य लागतो म्हणून त्यांनी साखर तयार करुन दाखविली.[४]

साखर कारखान्याच्या उभारणीमुळे त्या भागातील अनेक बेकारांना रोजगार मिळाला व त्या भागात थोडी का होईना आर्थीक सुबात्ता आली.

कोयनेच्या खो-यात ज्याठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सोय नव्हती त्या ठिकाणी पाटण तालुक्यातील विशेषतः डोंगराळ भागात माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय व्हावी व तीस मैलांच्या त्रिजेच्या परिसरात कॉलेज नाही ते उघडाव अशी बाळासाहेबांची फार दिवसांची इच्छा होती. त्यांच्या प्रेरणेने डिसेंबर १९६७ मध्ये कोयना एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. या संस्थेने माध्यमीक शाळा व एक महाविद्यालय सुरु केले. या महाविद्यालयाचे नांव आहे" बाळासाहेब देसाई महाविद्यालय पाटण" या संस्थेची प्रेरक व तारक शक्ती बाळासाहेब आहेत. गरीबांच्या कळवळयातून या शैक्षणिक संस्था निघालेल्या आहेत.[५]

अशा प्रकारे पाटणला जागे करुन उभे करणे त्याला शक्ती देणे, विकासाची ओढ निर्माण करणे, तालुका एक कुटुंब या नात्याने त्याची जडण घडण करणे व त्याचे कुटुंब प्रमुख म्हणून पन्नास वर्षाहून अधिक काळ काम करणे हाच बाळासाहेबांच्या जीवनाचा कृतार्थ आलेख आहे.

## बाळासाहेब व कोल्हापूर:-

कोल्हापूरच्या कर्मबगार भूमीत ना. बाळासाहेबांचा विद्यार्थी दशेतला बराचसा काळ घालविला होता. कोल्हापूरने बाळासाहेबांच्यावर सुसंस्कार घडवले व त्यांना मोठे केले बाळासाहेबांचा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय पिंड कोल्हापूरनेच घडविला आहे त्या कोल्हापूरचे ऋण फेडण्यासाठी व कोल्हापूरला संपन्न करण्यासाठी बाळासाहेबांनी भरीव स्वरुपाची कामगिरी केली आहे.[६]

" मी कोल्हापूरचा नागरीक नाही. रहिवासी नाही, पण कोल्हापूरचा

हितेच्छू आहे. राजर्षी शाहू महाराजांनी दाखविलेल्या बहुजन हिताय-बहुजन सुखाय या पंथाचा वारकरी आहे, कोल्हापूरच्या भल्यासाठी, हितासाठी सर्व ते प्रयत्न करीन" असे उद्गार कोल्हापूर नगरपालिकेने दिलेल्या मानपत्रात ~~केळक~~ कळकळीचे उत्तर ना. देसाई यांनी २७ एप्रिल १९६४ रोजी कोल्हापूर येथे दिले.[७]

या त्यांच्या उद्गारावरून कोल्हापूर संबंधीचा त्यांचा जिव्हाळा स्पष्टपणे दिसून येतो.

कोल्हापूर ही बाळासाहेबांची कर्मभूमी होती. कोल्हापूर शहर व कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी असंख्य कामे केली आहेत. गगनबावडा व करुळ यासारखे घाट फोडून कोकणातील हजारो लोकांचे जीवन सुखी व समृध्द केले. हे घाट फोडल्यामुळे दळणवळणाचा मार्ग मोकळा झाला. त्याचबरोबर पूल, धरणं , तळी, रस्ते, इमारती सरकारी कार्यालये व आदींची उभारणी करण्याचे कार्य बाळासाहेबांनी केले.[८]

कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ , कृषि महाविद्यालय स्थापनेत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. नगरपालिकेची भुयारी गटारी योजना व बाळासाहेबांनी कोल्हापूरला मिळवून दिली. कोल्हापूर जिल्ह्यातील लक्षावधी एकर जमीन सुजलाम्- सुफलाम् करण्याचे सामर्थ्य असलेल्या काळम्मावाडी, तुलसी व वारणा यासारख्या महाप्रचंड प्रकल्पांना शासनाची मंजुरी मिळवून देण्यात ना. बाळासाहेब देसाई यांचे प्रयत्न मोठे आहेत. कोल्हापूरची नाडी योग्य त-हेने जाणणारा व त्याची योग्य चिकित्सा करणारा असा अष्टपैलू म्हणून ना. यशवंतराव चव्हाण यांनी प्रथमपासून कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून बाळासाहेब देसाई यांची नियुक्ती केली होती. मंत्री पदावर असताना त्यांनी कोल्हापूरसाठी जास्तीत जास्त योजना मंजूर करून कार्यवाहीत आणल्या.[९]

महाराष्ट्राचे कुलदैवत कोल्हापूरच्या जोतिबाचे बाळासाहेब परमभक्त

होते. प्रत्येक वर्षी जोतिबाचे दर्शन घेण्यासाठी ते जात होते. व जोतिबापासून प्रेरणा घेऊन दु:खिताचे दु:ख दूर करण्यासाठी बाळासाहेब नव्या उत्साहाने कामास लागत.[१०]

जोतिबाच्या डोंगरावर विजेच्या दिव्यांची सोय करण्याचे महत्वाचे काम बाळासाहेबांनी केले. वीज मंडळाच्या अधिका-यांचा विरोध असताना सुध्दा हे काम स्वत: लक्ष घालुन करुन घेतले. जोतिबाच्या डोंगरावर शासकीय विश्रामगृह उभारण्याचे काम त्याचेच आहे. विश्रामगृह उभारण्याच्या कामामधील अडचणी श्री. जाधव नावांच्या ग्रामसेवकास स्वत:च्या बंगल्यावर ठेवून घेवून सर्व अडचणी दूर केल्या व विश्रामगृहाची उभारणी केली. जोतिबाकडे जाणारे रस्ते त्यांनी तयार केले या रस्त्याचे डांबरीकरण त्यांच्यामुळेच झाले.[११]

जोतिबाच्या डोंगरावरील बहुतांशी सुधारणा त्यांच्यामुळेच झाल्या आहेत. बाळासाहेबांनी संबंधित खात्याला सांगून वीज, पाणी धर्मशाळा चांगले रस्ते या सर्व सुधारणा घडवून आणल्या. त्याचप्रमाणे कोल्हापूरातील सामान्य कार्यकर्त्यांना पुढे आणण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले. प्रशासन व सत्तेचा उपयोग करुन त्यांनी कार्यकर्त्यांना मदत केली. कार्यकर्त्यांच्या योजनांना शासनाचा पाठींबा दिला., सत्तेचा आधार दिला, त्यामुळे अनेक कार्यकर्ते पुढे आले. कोल्हापूरातील अनेक संघटना , चळवळी, तालीम संघ, शैक्षणिक संस्था, सरकारी कार्यालये , छोटे उद्योगधंदे इत्यादींच्या निर्मीतींमध्ये बाळासाहेबांचा सिंहाचा वाटा आहे.[१२]

कोल्हापूर एस्. टी. स्टॅन्ड व डेपो, शिरोली येथील ऊस संशोधन केंद्र यांच्या निर्मितीत बाळासाहेबांचा वाटा आहे.

अशाप्रकारे विविध योजनांनी बाळासाहेबांनी संपन्न केले व आपल्यावरील कोल्हापूर शहराच्या ऋणाची काही अंशी का होईना उतराई केली.

बाळासाहेब व मुंबईतील शिवाजी महाराजांचे पुतळे:-

मुंबईत गेट-वे-ऑफ इंडिया व शिवाजी महाराजांचे पार्क या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे उभे करण्याचे काम बाळासाहेब देसाई यांनी केले.

अखिल महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज हे बाळासाहेबांचे स्फूर्तीस्थान होते तसेच ते शिवाजीचे भक्त होते मुंबई शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक व्हावे अशी अनेकांची इच्छा होती. मुंबई शहरात शिवछत्रपतींचा पुतळा कसा उभा राहणार याबद्दल शंका वाटत होती. पु तळा उभारण्यासाठी समित्या स्थापन झाल्या प्रत्येक कराठी माणसाने एक रुपया दिला तर किती रुपये होतील याचे हिशोब झाले, पुढा-यांना शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे विस्मरणच झाले. परंतु बाळासाहेब मात्र विसरले नाहीत, पुतळा उभारण्याच्या कामी त्यांनी त्यांनी पुढाकार घेतला.[१३]

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मुंबई या महाराष्ट्राच्या राजधानीत उभारला जावा हि इच्छा केली कित्येक वर्षे व्यक्त केली जात होती, अनेकांचे प्रयत्न त्या दिशेने चालले होते. मुंबई शहराचे महत्व आंतरराष्ट्रीय व विश्वव्यापी आहे, म्हणूनच भारतीय संस्कृतीतील सामर्थ्याची आणि सहिष्णूतेची मूर्ती असलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराजांची स्फूर्तीदायक प्रतिमा मुंबई शहरात असणे आवश्यक होते. त्यासाठी बाळासाहेब देसाई यांनी पुढाकार घेतला, अनेक दिवस रेंगाळत पडलेले छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे काम त्यांनी पूर्ण केले.[१४]

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करणेची बाळासाहेब देसाई यांची धाडपड आपणास त्यांनी भाई माधवराव बागल यांना पाठविलेल्या पत्रावरुन स्पष्ट दिसते ते पत्र सोबत जोडले आहे.[१५]

मुंबईतील गेट-वे-ऑफ इंडियाच्या समोर अपोलो बंदरावर उभा असलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य व सुंदर पुतळा ती पुतळ्याची जागा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

गृह मंत्री, महाराष्ट्र सरकार
सचिवालय, मुंबई-३२.

ता. २५-१०-१९६६

स. न. वि. वि.

आपलें ता. २०-१०-१९६६ चें पत्र मिळालें. आपल्या प्रकृतीच्या कांहीं तक्रारी सुरु झाल्या आहेत हे वाचून काळजी वाटली. चांगल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा व योग्य ती काळजी घ्यावी.

श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळ्याचे अुद्घाटन कार्यक्रमास आपण अुपस्थित राहूं शकला तर मलाही आनंद होअील. परन्तु मुंबअीचा प्रवास आपल्या प्रकृतीचे दृष्टीनें त्रासदायक ठरेल असे वाटते. शिवाजी पार्कवर छत्रपतींचा पुतळा अुभारला गेला म्हणजे मोठया जबाबदारींतून पार पडल्याचा आनंद मला लाभणार आहे. असो. बाकी कोल्हापूरला आल्यानंतर प्रत्यक्ष भेटीअन्ती बोलेन.

आपला
(signature)
(बाळासाहेब देसाअी)

श्री. माधवराव बागल,
राजारामपुरी, कोल्हापूर.

पुतळा उभारणीसाठी मिळू नये म्हणून मुंबईतील काही कारस्थानी लोकांनी कट रचला होता त्या भोगातील सौंदर्य नष्ट होईल असे सांगण्यापर्यंत विरोधकांनी मजल गाठली होती, पण बाळासाहेब देसाई यांच्या निर्धाराच्या ढालीवर ते युक्तीवादाचे वार नष्ट झाले. शिवाजीचा पुतळा तर उभा राहिलाच पण प्रत्येक वर्षी शिवजयंतीचा भव्य सोहळा मुंबईत होवू लागला मुंबईच्या सार्वजनिक जीवनाला मिळालेली ही सर्वात मोठी देणगी म्हटली पाहिजे.[१६]

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचे काम बाळासाहेबांनी पूर्ण केल्यानंतर, दिनांक २६-१-६१ रोजी पुतळ्याचे अनावरण महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री व नवभारताचे प्रमुख श्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.[१७]

गेट-वे-ऑफ इंडिया याठिकाणी पुतळ्याची उभारणी केल्यानंतर मुंबईतील शिवाजी पार्कवर शिवाजी महाराजांचा पुतळा उभारावा अशी यशवंतराव चव्हाण व जनतेची इच्छा बाळासाहेबांनी तातडीने पूर्ण केली. शिवरायांचा आदर्श महाराष्ट्रापुढे व भारतापुढे रहावा ही त्यांची अंतरीची तळमळ होती, या तळमळीमुळेच शिवाजी पार्क येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे काम बाळासाहेब देसाई यांनी केले. पुतळा समितीचे अध्यक्ष बाळासाहेब देसाई यांनी केले. पुतळा समितीचे अध्यक्ष बाळासाहेब देसाई हेच होते. छत्रपती शिवाजीच्या पूतळ्याचे अनाव ~~महाराजांच्या~~ ६ नोव्हेंबर १९६६ रोजी संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले १८ अ, ब.

अशा प्रकारे मुंबईत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांची प्रतिष्ठापणा करण्याचे काम बाळासाहेब देसाई यांनी केले.

## मल्लविद्येला प्रोत्साहान व विकास:-

बाळासाहेब देसाई यांनी कुस्तीच्या क्षेत्रात अंत्यत महत्वाचे काम

केले आहे. त्यांना मल्लविद्येचे मोठे आकर्षण होते. संस्थानांच्या विलिनीकरणानंतर मल्लविद्येचा राजाश्रय तुटल्यामुळे तिला उतरती कळा लागली, पहिलवानांतून उदयास आलेले कार्यकर्ते मामासाहेब मोहोळ यांनी मल्लविद्येला सावरण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कुस्तीगीर परिषदेची स्थापना केली. व पुढे तिचे रुपांतर मुंबई राज्य कुस्तीगीर परिषदेत झाले. या कुस्तीगीर परिषदेची अधिवेशने बाळासाहेब देसाई व मामासाहेब मोहोळ यांनी भरविली, व या कलेचा विकास साधला.[१९]

मल्लविद्येच्या उत्कर्षासाठी राज्य कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदाची धुरा १९५८ च्या दरम्यान मामासाहेब मोहोळ यांनी बाळासाहेबांच्याकडे सोपविली. मल्लविद्येचा खंदा पुरस्कर्ता कुस्तीगीर परिषदेला लाभला १९५८ नंतर अनेक वर्षे बाळासाहेब हेच कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांनी कुस्तीगीर परिषदेची धुरा धारण केल्याबरोबर परिषदेच्या कार्याला एकदम गती आली, मल्लविद्येच्या क्षेत्रातील क्रांती पर्वास सुरुवात झाली. मल्लविद्येला साजेल असा राजाश्रय त्यांनी मिळवून दिला.[२०]

कुस्ती हा राष्ट्रीय खेळ आहे. जागतिक क्षेत्रातही ही भारतीय कला आघाडीवर राहिली पाहिजे, मुंबई राज्याला या कलेची उज्वल परंपरा लाभलेली आहे, ती परंपरा कायम टिकवावी, यासाठी बाळासाहेबांची सतत धडपड होती. कुस्तीगीर परिषदांना अनुदान, सरकारी सहकारी पैलवानांना बक्षिसे, पैलवानांचा मानसन्मान कुस्तीचे प्रशिक्षण, कुस्ती पंचाची शिबीरे इत्यादीं माध्यमातून बाळासाहेबांनी कुस्ती कलेचा विकास साधला.[२१]

हिंदकेसरी श्रीपती खंचनाळे, गणपतराव आंदळकर, मारुती माने यांच्या उदयामध्ये बाळासाहेब देसाई यांचा सिंहाचा वाटा आहे. या पैलवानांनी हिंदकेसरी हा किताब बाळासाहेबांच्या प्रेरणेमुळे व सहकार्यामुळे मिळालेला आहे.

भारतातील पहिले हिंदकेसरी पैलवान श्रीपती खंचनाळे बाळासाहेबांचे

श्रण व्यक्त करताना म्हणतात," ३ मे १९५९ रोजी मामासाहेब मोहोळ यांना बाळासाहेबांनी बोलावले व सांगीतले की," हा उत्तम पैलवान आहे. पहिल्या हिंद केसरी स्पर्धेसाठी या पैलवानास घेवून जावा," दिल्ली येथे रेल्वे स्टेडियम झालेल्या हिंदकेसरी या बहुमानासाठी झालेल्या स्पर्धेत रुस्तम-ए-पंजाब बनतासिंग या पंजाबच्या पैलवानाला चीतपट केले व पहिला हिंदकेसरी हा बहुमान मिळविला, हिंदकेसरी हा बहुमान बाळासाहेबांच्यामुळे मला मिळाला.[२२]

राष्ट्रहित साधण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या कुस्तीगीर परिषदेला रास्त अनुदान द्यावे अशी परिषदेच्या वतीने त्यांनी महाराष्ट्र सरकारला विनंती केली महाराष्ट्र सरकारने सांगोपांग विचार करुन आठ हजार रुपयाचे अनुदान मंजूर केले. १९६० साली गणपतराव आंदळकर यांनी " हिंदकेसरी " पदाचा बहुमान पटकाविला १९६२ साली जकार्ता येथील अशियाई क्रिडा स्पर्धेसाठी बाळासाहेब देसाई यांनी महाराष्ट्रातून गणपतराव आंदळकर, मारुती माने व नारायण घुमे यांना पाठविले या स्पर्धेत या पैलवानांनी बहादूरी गाजविली, तीन सुवर्ण पदके, सहा रौप्य पदके, तीन ब्रॉंझ पदके भारतीय मल्लांनी पटकावली. सोव्हिएत देशाच्या दौ-यावर गेलेल्या मारुती माने व संचनाळे यांच्या पाठीमागे बाळासाहेब खंबीरपणे उभे होते.[२३]

कुस्तीच्या क्षेत्रावर बाळासाहेब देसाई यांचे विशेष लक्ष होते. महाराष्ट्राच्या मल्लांनी सर्व भारतात नांव गाजवले पाहिजे. असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी पैलवानांना मानधन दिले त्यांच्या आर्थीक अडचणी दूर केल्या. त्यांच्यासाठी सुखसोयी उपलब्ध करुन दिल्या इत्यादी कामे केली.[२४]

कुस्तीच्या क्षेत्रातील बाळासाहेबांचे अत्यंत महत्त्वपूर्ण काम म्हणजे कुस्तीच्या मैदानावरील करमणूक कर त्यांनी रदद केला. कंत्राटदार पध्दतीने कुस्तीची घेतली जात होती. शिवाय मैदानावर कर-

मणूक कर आकारला जात होता. त्यामुळे त्या कंत्राटदाराला कर भरावा लागे, त्याचप्रमाणे मल्लांना पैसे, देणगी, जाहिरात खर्च व इतर खर्च यामुळे कंत्राटदाराल फायदा होत नसे, याचा परिणाम कुस्ती खेळावर झाला. मैदाने कमी होवू लागली कुस्ती कलेवर होणारा हा विपरीत परिणाम नाहिसा करण्याचे त्यांनी ठरवले. मैदानवरील करमणूक कर त्यांच्या प्रयत्नामुळे रद्द केला गेला.[२५]

बाळासाहेबांच्यामुळे कुस्ती क्षेत्राला ऊर्जीतावस्था आली होती. पैलवानांच्याबरोबर त्याचे जिव्हाळ्याचे सबंध होते. परंतु त्यांच्या पश्चात या कलेकडे विशेष लक्ष देणारे कोणी आढळत नाही. बाळा-साहेबांच्याबरोबर कुस्तीची शान सपली असेहिंदकेसरी श्रीपती खंचनाळे यांनी व्यक्त केली.

## तमाशा कलेच्या विकासासाठी प्रयत्न:-

महाराष्ट्रात दोनच कला अशा आहेत,की,त्या लोकांचा कला म्हणून ओळखल्या जातात. लोकांनी त्या जोपासल्या पाहिजेत पहिली कला कुस्तीची आणि दुसरी कला तमाशाची होय. या दोन्हीही कलांना, उत्तेजन देण्याचे कार्य बाळासाहेबांनी केले आहे.

मराठी तमाशाचा कायापालट व्हायला हवा, या क्षेत्रातला मागासलेपणा दूर व्हायला हवा, त्याला आर्थिक,प्रतिष्ठित स्वरुप यायला हवे, अशा विचारसरणीचा पाठपुरावा बाळासाहेब देसाई यांनी केलेला आहे. तमाशाच्या कलेला सध्या जे नवं स्वरुप आलेले आहे. त्याच्या श्रेयात बाळासाहेब देसाई यांच्या प्रोत्साहानाचा मोठा वाटा आहे.[२६]

तमाशा परिषद व कलाकार यांच्यात वाद निर्माण झाला होता. बाळासाहेबांच्या प्रयत्नामुळे हा वाद संपुष्टात आला. त्यांनी परिषदेच्या एकीकरणाचे प्रयत्न केले त्यातूनच मराठी तमाशा परिषद जन्माला आली. या नव्या परिषदेने कोल्हापूरला २५ एप्रिल १९५९ रोजी पहिले अधिवेशन घेतले. बाळासाहेबांनी त्याच उद्घाटन करुन एका नव्यापर्वाला प्रारंभ

केला. त्यांच्या प्रयत्नामुळे तमाशाचा जाचक करमणूक कर माफ झाला. वयोवृध्द झालेल्या मानधन सुरु केले खेळ करण्यासाठी जिल्हाधिका-यांची परवानगी लागे, त्यामुळे कलावंतांची कुचंबणा होई, म्हणून खेळासाठी तहसिलदाराला परवानगी देण्याचे अधिकार दिले अशा किती तरी उपकारक गोष्टी बाळासाहेबांच्या प्रयत्नामुळे घडून आल्या.[२७]

महाराष्ट्र राज्य तमाशा परिषदेचे तिसरे अधिवेशन बीड(मराठवाडा) येथे दि. १४-११-१९६१ रोजी प्रसिध्द कवी व गीत रामायणकार ग.दि. माडगूळकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई यांनी केले, त्याप्रसंगी तमाशा परिषदेचे अध्यक्ष रंगराव पाटील म्हणतात. " बाळासाहेबांनी तमाशा कलेस मानाचे स्थान मिळवून दिले. याबद्दल त्यांना कोणीही धन्यवाद देईल त्यांनी गेली वीस वर्षे गरीबांची दु:खे नाहीशी करण्याच्या कामी अविरत श्रम घेतले. तमाशातील गुणी कलावंताचे सकंटमय जीवन त्यांच्या लक्षात येताच त्यांनी या कलेच्या उध्दारासाठी परिषदेला जन्म देवून हीकला ऊर्जितावस्थेत आणली. "[२८]

अशाप्रकारे सांस्कृतिक जीवनाचा वारसा जपण्याचा प्रयत्न बाळासाहेबांनी केला. जुन्या कलाकाराबददल आदर ठेवून त्यांना शासनातर्फे मानधन देण्याचा उपक्रम त्यांनी सुरु केला लोककलेमध्ये विशेष करुन तमाशा परिषदेच्या सर्वकष्य विकासासाठी त्यांनी फारच प्रयत्न केले.

## पत्रकार व बाळासाहेब देसाई:-

वृत्तपत्रे हि लोकशाही राष्ट्रातील खरी शक्ती आहे, अशी बाळासाहेबांची धारणा होती. पत्रकार हा शासन आणि जनता यांच्यामधला महत्वाचा दूवा आहे त्यांच्या लेखणीमध्ये तलवारीपेक्षा मोठे सामर्थ असते असे ते मानतात, या त्यांच्यामधील शक्तीचा ओघ विधायक कार्याकडे वळला तर समाजाचे कल्याण

करण्यात पत्रकार महत्वाची कामगिरी बजावू शकतील असा त्यांचा ठाम विश्वास होता, आणि म्हणूनच पत्रकारांच्या बरोबर अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध त्यांनी ठेवले होत.[२९]

जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या वृत्तपत्राच्या संपादकापासून मुंबई सारख्या ठिकाणी निघणा-या अव्वाढव्य प्रांतीक वृत्तपत्राच्या संपादकाशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे आणि आपूलकीचे स्नेह संबंध होते. विरोधी असणारी वर्तमानपत्रे सुध्दा बाळासाहेबांच्या कामगिरीचा सात्याने गौरव करीतहोती. [30]

दैनिक लोकसत्ता मुंबईचे संपादक श्री ह. रा. महाजने, दै. तरुण भारताचे नागपूरचे संपादक प्रसिध्द साहित्यीक श्री भाऊसाहेब माडखोलकर, दै. पुढारी कोल्हापूरचे संपादक ग. गो. जाधव, दै. सत्यवादी कोल्हापूरचे संपादक बाळासाहेब पाटील, दै. समाज कोल्हापूरचे संपादक श्री आर. बी. जाधव, साप्ताहिक धुमकेतू-कोल्हापूरचे संपादक श्री राजाभाऊ जोशी, पत्रकार व दै. मराठाचे संपादक प्र. के. अत्रे , दै. तरुण भारत कोल्हापूर ऑफीस इनचार्ज श्री श्रीपाद देशपांडे आदींच्या बरोबर बाळासाहेबांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. दै. लोकसत्ता मुंबईचे संपादकाला त्यांनी सर्व प्रकारची मदत केली त्यांच्या पाठिंब्यामुळेच व सहकार्यामुळे लोकसत्ता हे दैनिक पूढे आले व प्रसिध्दिस पावले.

कोल्हापूरच्या दैनिक पुढारीच्या रौप्यमहोत्सवी समारंभात बाळासाहेब म्हणतात. "पुढारीने कोल्हापूरच्या कर्तृत्वाची परंपरा राखली बहुजन समाजाचे हित व प्रगती यासाठी कार्य करण्याच्या जिददीने श्री ग. गो. जाधव यांनी दै. सुरु केले आणि कोल्हापूरच्या परंपरेला ताजेपा कर्तृत्वाने ते यशस्वी केले.[३१]

प्रभावी वक्ते व उच्च अभिरुचीचे रसीक:-
==========================

बाळासाहेब देसाई हे महाराष्ट्रातील एक प्रभावी वक्ते होते आपल्या अमोघ व प्रभावी वाणीने सभाचे अनेक फड त्यांनी जिंकले होते. उच्च अभिरुचीचे ते रसीक हाते साहित्य, नाटय संगीत इत्यादी कलाचे मार्मीक व संमजस्य भोक्ते होते. वा सी. बेंद्रे यांनी लिहलेल्या" मालोजी राजे व शहाजी महाराज" चरित्र, रणजीत देसाई यांनी लिहिलेले छत्रतीचे चरित्र इत्यादीमध्ये बाळासाहेबांची

प्रेरणा महत्वाची होती. श्री धनंजय कीर यांना महात्मा फुले, डॉ. आंबेडकर व शाहू यांची चरित्रे लिहिण्यात बाळासाहेबांची फार मोठी आर्थिक मदत व प्रेरणा होती अनेक ग्रंथकारांना त्यांनी प्रेरणा दिली होती.[३२]

बाळासाहेबांचे वास्तव्य मुंबईत" मेघदूत" या बंगल्यात होते. मेघदूताचा दिवाणखान्यात नेहमी कारागीरव, शेतकरी - कामगार, हरिजन अडलेले व नडलेले यांनी सदा भरलेला असायचा कोणी म्हणायचा मला नोकरी मिळाली , कोणी म्हणे माझ्यावरील संकटे टळली, कोणी म्हणतो आमच्या गावचा रस्ता झाला व एस्टी. थांबते तर कोणी म्हणतो दवाखान्यात तुम्ही पाठविल्यामुळे माझ्या वडिलांची तब्येत चांगली आहे तर कोणी म्हणतो आमच्या कार्यक्रमाला दिवस द्या अशा-अशाप्रकारे बहुजन समाजाची अनेक कामे बाळासाहेबांनी केलेली आहेत.[३३]

अशा त-हेने लोकनेत्याने महाराष्ट्राची सेवा ४५ वर्षाहून अधिक काळ केलेली आहे.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की बाळासाहेब ज्याप्रमाणे महसूल व इतर मंत्री म्हणून यशस्वी झाले तसेच त्यांनी महाराष्ट्रातील लोककला,तमाशा, कुस्ती इत्यादी क्षेत्राल लोकमानसात स्थान मिळवून दिलेच, पण शासनाचे सहकार्यही मिळवून देण्यात त्यांनी आपल्या अधिकाराचा वापर केला. कोल्हापूर व पाटण भागाचे ते तर एक भाग्यविधातेच ठरले . कारण या भागात झालेल्या प्रगतीचे श्रेय त्यांच्याकडे जाते कोल्हापूरात शिवाजी विद्यापिठाची स्थापना करुन पश्चिम महाराष्ट्रावर त्यांनी आपले कायमचे ऋण केले.

## :- संदर्भ -:


१) शिवतेज:-शिवाजीराव देसाई स्मरणिका १९८७, पान नं. ४३.

२) मुलाखत:- श्री भागवतराव देसाई मरळी, माजी अध्यक्ष जिल्हा परिषद सातारा वय-६८ दिनांक- १९-१०-१९९०.

३) मुलाखत:-श्री बाबूरावजी कोतवाल , स्वातंत्र्य सैनिक व माजी आमदार कराड वय= ५८ दिनांक-५-१-१९९०.

४) शिवतेज:- शिवाजीराव देसाई स्मरणिका १९८७ पान नं. २१, ३३.

५) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी. सुर्यवंशी पान नं. ३२५.

६) ना. बाळासाहेब देसाई आणि त्यांचे काही विचार- संग्राहक-अ.अ.मेमन पान नं. ५३, ५४. - व्यक्तिदर्शन = द.शि. बर्वे पान नं.2

७) ना. बाळासाहेब देसाई आणि त्यांचे काही विचार:-संग्राहक-अ.अ.मेमन पान नं. २.

८) संयुक्त= महाराष्ट्र - ना बाळासाहेब देसाई मान अंक- रा. कृ. कु-हाडे चव्हाण पान नं. ५३, ५४.

९) महाराष्ट्राचे भाग्यविधाते:- ना. बाळासाहेब देसाई=सौ. सविताबेवी मिसाळ पान नं. ३२.

१०) संयुक्त महाराष्ट्र - ना. बाळासाहेब देसाई मान अंक- रा. कृ.कु-हाडे चव्हाण पान नं. ४६.

११) मुलाखत:- श्री बापूसाहेब कावते- कार्यकारी संपादक, दैनिक समाज कोल्हापूर वय= ७३ दिनांक= २२-७=१९८९.

१२) मुलाखत= श्री श्रीपाद देशपांडे ऑफीस इनचार्ज तरुण भारत कार्यालय कोल्हापूर वय= ५८ दिनांक= ३-७-१९८९.

१३) साप्ताहिक धुमकेतू = स्वर्गीय ना. बाळासाहेब देसाई स्मृती विशेषांक, २३ एप्रिल १९८७ पान नं. २७.

१४) आमचे शिक्षणमंत्री:- ना. बाळासाहेब देसाई-एस्. एस्. चौगुले पान नं. १४५.

१५) बाळासाहेब देसाई यांचे पत्र:- शिवाजी महाराजाचा पुतळा उभारणासंबंधी.

१६) शिवतेज:- शिवाजीराव देसाई स्मरणिका १९८७ पान नं. ३१.

१७) साप्ताहिक ग्रामोध्दार सातारा, ६ फेब्रुवारी १९६१.

१८) अ) दैनिक महाराष्ट्र टाईम्स मुंबई- मंगळवार दिनांक ८ नोव्हेंबर १९८६.


...१५१...

ब) दैनिक मराठा, मुंबई- नागपूर, मंगळवार दिनांक ८ नोव्हेंबर १९६६.

१९) मुलाखत:- श्री राजाभाऊ जोशी कोल्हापूर , संपादक=साप्ताहिक धूमकेतू कोल्हापूर वय= ६७ दिनांक = २७-७-१९८९.

२०) बहुजन- हिताय बहुजन-सुखाय:- के. जी. सुर्यवंशी, पान नं. ३१२, ३१४.

२१) मुलाखत:- हिंदकेसरी गणपतराव आंदळकर, अध्यक्ष कोल्हापूर शहर कुस्ती संघ. वय=६२ दिनांक = २१-९-१९९०.

२२) मुलाखत:- हिंदकेसरी श्रीपती खंचनाळे, अध्यक्ष कोल्हापूर शहर कुस्ती संघ. वय=६२, दिनांक- ५-१०-१९९०.

२३) बहुजन- हिताय बहुजन सुखाय- के. जी. सुर्यवंशी पान नं. ३१५, ३१६.

२४) मुलाखत:- हिंदकेसरी गणपतराव आंदळकर , अध्यक्ष कोल्हापूर जिल्हा तालीम संघ, वय=६२, दिनांक २१-९-१९९०.

२५) मुलाखत:- हिंदकेसरी श्रीपती खंचनाळे अध्यक्ष कोल्हापूर शहर कुस्ती संघ, वय= ६२, दिनांक ५-१०-१९९०.

२६) दौलत= ना. बाळासाहेब देसाई एकसष्टी सत्कार समिती अंक दिनांक १० मार्च १९७०, पान नं. २८.

२७) बहुजन हिताय बहुजन सुखाय- के.जी. सुर्यवंशी. पान नं. २३.

२८) साप्ताहिक :- ग्रामोद्धार सातारा, दिनांक २० नोव्हेंबर १९६१.

२९) महाराष्ट्राचे भाग्यविधाते- ना. बाळासाहेब देसाई, सौ. सविितादेवी मिसाळ पान नं. ३०.

३०) मुलाखत:- बापूसाहेब कामते कोल्हापूर संपादक दैनिक समाज कोल्हापूर , संपादक दैनिक समाज कोल्हापूर वय= ७३ दिनांक २२-७-१९८९.

३१) दैनिक पुढारी कोल्हापूर, २ जानेवारी १९६३.

३२) दौलत :- ना. बाळासाहेब देसाई एकसष्टी सत्कार समिती अंक दिनांक १० मार्च १९७०. पान नं. ८९.

३३) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी. सुर्यवंशी. पान नं. ३६५.